AP 17-20

Peer Reviewed Journal
ISSN 2319-8648
Impact Factor (SJIF)
Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

International Peer Reviewed Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

## Special Issue 20 Vol. I
## on
## भारतीय समाज और विकलांग (दिव्यांग) विमर्श
## Indian Society & Ideology of Disability

October 2019

Associate Editor
Dr. Shivaji Wadchkar

Guest Editor
Principal Dr. V.D. Satpute

Assistant Editor
Dr. V.B. Kulkarni
Dr. A.K. Jadhav
Dr. S.A. Tengse

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

www.publishjournal.co.in

Scanned with OKEN Scanner

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue XX, Vol. I | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
October 2019 | SJIF | Impact Factor : 7.139

# दिव्यांग अधिकार कायदा 2016 - एक संक्षेप

डॉ. संजाराम झोडगे
नूतन महाविद्यालय, सेलू. जि. परभणी.

---

सन 2011 च्या जनगणनेनुसार भारतात दिव्यांग व्यक्तींची संख्या 268,14,994 एवढी आहे. भारतातील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात ही संख्या 2.21 टक्के एवढी होते. दिव्यांगांच्या शिक्षण, पुनर्वसन, कल्याणासाठी केंद्र शासनाने काही कायदे केले असून 2016 चा कायदा दिव्यांगांसाठी महत्त्वपूर्ण आहे. संयुक्त राष्ट्रसंघामध्ये डिसेंबर 2006 मध्ये विकलांग व्यक्तींच्या अधिकार व सक्षमीकरणासंदर्भातील करार स्वीकृत करण्यात आला. ज्यावर भारतानेही स्वाक्षरी केलेली असून त्याचे समर्थन केले आहे. त्या अनुषंगाने फेब्रूवारी 2013 मध्ये तत्कालीन केंद्रिय सामाजिक न्यायमंत्री श्री. मल्लिकार्जुन खरगे यांनी 'विकलांग व्यक्ती अधिकार विधेयक 2014' राज्यसभेत सादर केले जे डिसेंबर 2016 मध्ये संसदेत संमत करण्यात आले आणि 'दिव्यांग व्यक्ती अधिकार कायदा 2016' अस्तित्त्वात आला. हा कायदा होऊन दोन वर्ष उलटले असले तरी त्याविषयी दिव्यांगांमध्ये फारशी माहिती, जागृती झाल्याचे दिसत नाही.

यापूर्वीच्या अपंग व्यक्ती कायदा 1995 मध्ये केवळ सात प्रकारचे अपंगत्व निर्देशित करण्यात आले होते. मात्र या 2016 च्या नवीन कायद्यानुसार अपंगत्वाचे 19 प्रकार मान्य करण्यात आले आहेत. 40 टक्के वा त्यापुढे अपंगत्व असणाऱ्या व्यक्तींना Persons with Benchmark Disabilites असे संबोधले असून त्यांनाच दिव्यांगांसाठीच्या सर्व योजना, सवलती अनुज्ञेय असणार आहेत. एकूण 17 प्रकरणांत विभागलेल्या या कायद्यात दिव्यांगांचे शिक्षण, आरोग्य, रोजगार, हक्क, आयोग, निधी, आयुक्त इ.संबंधी तरतुदी केलेल्या आहेत.

या कायद्यानुसार दिव्यांगांना समानता आणि भेदभावविरहित जीवन जगण्याचा अधिकार असून अपंगत्वाच्या आधारे दिव्यांगांशी कुठलाही भेदभाव करता येणार नाही. अमानवी व्यवहार, दुरुपयोग, हिंसा, शोषण यांपासून संरक्षण तसेच नैसर्गिक आपत्ती, संघर्ष व संकटकाळी समानतेच्या आधारे दिव्यांगांना संरक्षण देणे क्रमप्राप्त आहे. दिव्यांगांचा वैयक्तिक, कौटुंबिक व संपत्तीविषयक निर्णय घेण्याचा अधिकार अबाधित असून त्यांना सर्वत्र अडथळामुक्त संचार मिळण्यासाठी शासनाने प्रयत्नशील राहण्यसंबंधी सूचविण्यात आले आहे.

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue XX, Vol. I Octomber 2019 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319-8648 Impact Factor : 7.139

दिव्यांगांच्या कल्याण, पुनर्वसनासाठी शिक्षण ही एक महत्त्वाची बाब आहे. या कायद्यानुसार शासकीय, अनुदानप्राप्त खाजगी व इतर शिक्षणसंस्थांमध्ये दिव्यांगांना भेदभावविरहित, समावेशक शिक्षण मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. दिव्यांगांना आवश्यक व अनुकूल अशी इमारत, परिसर, निवास, परिवहन आदी सुविधा मिळाव्यात. वयाच्या अठरा वर्षापर्यंत दिव्यांग विद्यार्थ्यांना पुस्तके, अध्ययन सामग्री, सहायक उपकरणे इ. मोफत देण्यात यावीत. शासन व स्थानिक संस्थांनी दर पाच वर्षांनी शाळेत जाणाऱ्या मुलांचे सर्वेक्षण करुन दिव्यांग बालकांची माहिती मिळवावी. दिव्यांगांना योग्य शिक्षण देण्यासाठी शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. गरजानुरुप अभ्यासक्रम, परीक्षापद्धती, शिष्यवृत्ती इ. सुविधा देण्यात याव्यात.

दिव्यांगांच्या कौशल्य विकास व रोजगारासंबंधीही या कायद्यात तरतूद करण्यात आली असून कोणतीही आस्थापना, कार्यालय केवळ अपंगत्वाच्या आधारे व्यक्तीला रोजगारापासून वंचित ठेऊ शकणार नाही. तसेच त्या आधारे पदोन्नती नाकारता येणार नाही. दिव्यांगांच्या रोजगार, स्वंयरोजगार, कौशल्य विकासासंबंधी तक्रा निवारणासाठी प्रत्येक शासकीय आस्थापनेत अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

या कायद्यान्वये दिव्यांगांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात आली असून आपत्तींमध्ये सहायता, दोन वर्षापेक्षा अधिक काळापासून बेरोजगार असलेल्या दिव्यांगांना बेरोजगार भत्ता, अति दिव्यांगत्व असलेल्यांना काळजीवाहक भत्ता, विशेष विमा योजना इ. साठी शासनाने योजना तयार कराव्यात अशी तरतूद आहे. दिव्यांगांना मोफत आरोग्य सेवा, अपंगत्व प्रतिबंधक योजना, जनजागृती, पुनर्वसन, संशोधन इ.साठी शासन व स्थानिक संस्थांनी प्रयत्न करावेत.

दिव्यांगांना सांस्कृतिक जीवन, मनोरंजन, क्रीडा आदी क्षेत्रात सर्वसामान्य व्यक्तींप्रमाणेच समान अधिकार असून प्रतिभावान कलाकार, खेळाडू, लेखक यांना प्रोत्साहनपर योजना, सुविधा तंत्रज्ञान, उपकरणे व व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच दिव्यांगांच्या विशेष क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, पुरस्कार यांचे आयोजन करावे.या कायद्यान्वये दिव्यांगांना शिक्षण व नोकरीसाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली असून सर्व सरकारी व अनुदानप्राप्त शिक्षणसंस्थांमध्ये दिव्यांगांसाठी किमान 5 टक्के तर सर्व शासकीय व निमशासकीय आस्थापनांतील नोकऱ्यांमध्ये 4 टक्के जागा दिव्यांगांसाठी आरक्षित ठेवणे



PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

NUTAN MAHAVIDYALAYA SELU



Special Issue XX , Vol. I Octomber 2019 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

बंधनकारक आहे. खाजगी क्षेत्रात एकूण कर्मचारीसंख्येच्या किमान पाच टक्के दिव्यांगांना नोकरी देणाऱ्या खाजगी आस्थापनांना शासन प्रोत्साहन देईल. तसेच शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेशासाठी व नोकरीतील नियुक्तीसाठी दिव्यांग व्यक्तींना अधिकतम वयाची अट पाच वर्षांसाठी शिथिल राहील. शासनाच्या सर्व योजना, सवलतीत दिल्या जाणाऱ्या जमिनी इ. मध्येही दिव्यांगांसाठी 5 टक्के आरक्षण असणार आहे.

या कायद्यानुसार शासनाची कर्तव्ये, जबाबदारी निश्चित करण्यात आली असून दिव्यांगांच्या अधिकारासंबंधी जागृती करणे, सर्व शिक्षणसंस्थांना दिव्यांगांच्या क्षमतानुरुप बनवणे, दिव्यांगांच्या अधिकारांची माहिती शाळा, विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करणे, दिव्यांगांच्या सहज संचारासाठी बसस्थानक, रेल्वेस्टेशन, विमानतळ व इतरत्र पूरक सुविधा निर्माण करणे ही शासनाची जबाबदारी असून यापुढे कोणत्याही बांधकाम, निर्माण संरचनेला ती दिव्यांगांना अनुकूल असल्याशिवाय परवानगी, पूर्णता प्रमाणपत्र दिले जाणार नाही. सर्व प्रकारचे प्रशिक्षण, विविध अभ्यासक्रम यांमध्ये दिव्यांगत्व हा घटक अनिवार्य असणार आहे. सर्व विद्यापीठे दिव्यांगांसंबंधी अध्यापन, अभ्यास व संशोधनाला प्रोत्साहन देतील व त्यासाठी अभ्यासकेंद्राची स्थापना करतील.

दिव्यांगांसंबंधी धोरणे, योजना यासंबंधी शासनास सल्ला देण्यासाठी तसेच कार्यरत योजना, संस्थांची समीक्षा करण्यासाठी केंद्रीय, राज्य व जिल्हास्तरावर सल्लागार मंडळावी, समितीची स्थापना शासनाने करणे अपेक्षित आहे. या समितींमध्ये संबंधित खात्याचे मंत्री, राज्यमंत्री, संसद व राज्यस्तरावर विधिमंडळ सदस्य, विविध खात्यांचे सचिव यांच्यासह दिव्यांगांचे प्रतिनिधी असतील. या मंडळांची सहा महिन्यातून किमान एक तरी बैठख होणे आवश्यक आहे. याशिवाय केंद्र व राज्य शासन दिव्यांगांसाठी मुख्य आयुक्त व राज्य आयुक्तांची नियुक्ती करतील. हे आयुक्त संबंधित शासनास वार्षिक व विशेष अहवाल सादर करतील.

दिव्यांगासाठी विशेष न्यायालय व निधीची तरतूदही या कायद्यान्वये करण्यात आली आहे. दिव्यांगांना न्याय व जलद न्यायालयीन प्रक्रियेसाठी राज्यशासन प्रत्येक जिल्ह्यासाठी एका विशेष न्यायालयाची योजना करेल. तसेच दिव्यांगांसाठी राष्ट्रीय निधी व राज्य निधीची उभारणी करण्यात येईल.

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani



Scanned with OKEN Scanner

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue XX, Vol. I | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Octomber 2019 | SJIF | Impact Factor : 7.139

या कायद्याच्या सोळाव्या प्रकरणामध्ये अपराध आणि शिक्षा यासंबंधीची तरतूद करण्यात आलेली आहे. या कायद्याचे वा त्यातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस दहा हजारापासून पाच लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शखतो. अनेकदा दिव्यांगांसाठीच्या सवलती, सुविधा बोगस, खोट्या अपंगांकडून लाटल्या जातात हे लक्षात घेऊन खोटेपणाने, कपटाने, अपंगांसाठीच्या योजनांचा लाभ मिळवणाऱ्यांना या कायद्यान्वये दोन वर्षापर्यंतचा तुरुंगवास किंवा एक लाख रुपयापर्यंतच्या दंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. तसेच कोणत्याही ठिकाणी दिव्यांगांना अपमानित करणे, हल्ला करणे, बळाचा वापर करणे, चारित्र्यहनन करणे, शोषण, इजा करणे इ. प्रकारच्या अपराधासाठी सहा महिने ते पाच वर्षांचा तुरुंगवास व दंड होऊ शकतो.

अशाप्रकारे दिव्यांगांचे शिक्षण,आरोग्य, रोजगार, हक्क यांचा विचार करुन केला गेलेला हा कायदा दिव्यांगांच्या सक्षमीकरणासंदर्भातील एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. दिव्यांगांना आपल्या शारीरिक व्यंगावार मात करुन समाजात सन्मानाने जगता यावे यासाठीही हा कायदा महत्त्वपूर्ण ठरेल. शेवटी कुठल्याही कायदा, नियमांची यशस्विता ही त्यांच्या प्रभावी अंमलवजावणीवर, अवलंबून असते अन्यथा ते फक्त कागदावरच राहतात. दिव्यांग अधिकार कायद्याच्या बाबतीत असे होऊ नये यासाठी सर्वांनीच सजग, सतर्क राहिले पाहिजे एवढेच.

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani



Scanned with OKEN Scanner